महारष्ट्र शिक्षण समिती, निलंगा संचालित

# महारष्ट्र महाविद्यालय, निलंगा

# इतिहास विभाग

# मोडी लिपी प्रमाणपत्र कोर्स

# (२०२३-२४)

**मोडी लिपी प्रमाणपत्र कोर्सचा उद्देश:**

१. विद्यार्थ्यांना मोडी लिपीची ओळख करून देणे
२. लुप्त होत चाललेल्या मोडी लिपीचे संवर्धन, प्रचार आणि प्रसार करणे
३. विद्यार्थ्यांमध्ये लिप्यंतर कौशल्य विकसित करणे
४. मोडी लिपीच्या माध्यमातून इतिहास विषयक संशोधन वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे.
५. विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती निर्माण करणे
६. विद्यार्थांमध्ये लिप्यांतर कौशल्य विकसित करणे.

**मोडी लिपी प्रमाणपत्र कोर्स विषयी:**

१. अभ्यासक्रमाचा कालावधी: मोडी लिपी प्रमाणपत्र अभ्यासक्रम हा एक महिना अर्थात ३० तासिकांचा असून त्याची अंतिम ४० गुणांची परीक्षा व अंतर्गत मूल्यमापन अथवा प्रात्यक्षिक १० गुणांचे असेल.
२. या प्रमाणपत्र कोर्ससाठी महाविद्यालयातील सर्व शाखेचे विद्यार्थी, प्राध्यापक, तहसील व अभिलेख विभागातील कर्मचारी, मोडी लिपीची जाण असणारे जिज्ञासू या कोर्ससाठी प्रवेश घेवू शकतील.
३. कोर्सच्या तासिका सोमवार ते शनिवार दु.०३:०० ते ०४:०० या वेळेत आणि रविवार स.१०:०० ते ०२:०० या वेळेत होतील.
४. मोडी लिपी प्रमाणपत्र कोर्ससाठी पहिल्या आठवड्यात मोडी लिपीचे तज्ञ अभ्यासक डॉ. कामाजी डक हे प्रशिक्षक म्हणून उपस्थित राहणार आहेत. त्यानंतर डॉ. एस. जी. बेंजलवर व प्रा. डी. व्ही. पवार हे पुढील प्रात्याक्षिके व वाचन प्रक्रीयेविषयी मार्गदर्शन करतील.
५. हा प्रमाणपत्र कोर्स एकूण ०२ क्रेडीट म्हणजेच ५० गुणांचा असणार आहे. शेवटी लेखी परीक्षा होईल, त्यात उत्तीर्ण होणाऱ्या प्रत्येकास प्रमाणपत्र देण्यात येईल.
६. या कोर्ससाठी प्रवेशास प्रथम येणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल.

**मोडी लिपी कोर्सची उपयुक्तता:**

१. मोडी लिपीचा कोर्स करणाऱ्यास लिप्यंतर काम करता येईल.
२. महाराष्ट्राच्या प्रत्येक महसूल व भूमी अभीलेख विभागातील कार्यालयांमध्ये मोडी लिपितील दस्तावेज आजही वाचक नसल्याकारणाने दुर्लक्षित आहे, तो वाचण्यासाठी वाचक वर्ग तयार होईल.
३. इतिहास विषयात संशोधन करू इच्छीनाऱ्या विद्यार्थ्यास भविष्यात मोडी लिपी प्रशिक्षणाचा लाभ होईल.
४. मोडी लिपी वाचनाचे कौश्यल्य आत्मसात करणाऱ्यास त्यातून रोजगार निर्माण करता येईल.
५. मोडी लिपीचे कौशल्य आत्मसात केलेल्या विद्यार्थ्यास पुराभिलेखागर व पुरातत्व विभाग आणि वस्तूसंग्रहालये इत्यादी ठिकाणी नौकरीच्या संधी उपलब्ध होऊ शकतील.

## अधिक माहिती वा संपर्कासाठी


| डॉ. एस. जी. बेंजलवार | श्री डी. व्ही. पवार | ए. बी. महाजन |
|---|---|---|
| ९९७००७५०४१ | ९०९६०६८४९५ | ९५१८५०८४९५ |